# परिपत्रक

## विविध योजनांसाठी शिखर संस्थानिहाय समन्वयक नियुक्तीबाबत.

शिवाजी विद्यापीठ हे संशोधनाच्या बाबतीत नेहमीच अग्रेसर राहीले असून संशोधनामध्ये विद्यापीठाचा नावलौकीक वृध्दींगत झालेला आहे. विविध वित्तीय शिखर संस्था वेळोवेळी अनेक योजना व प्रकल्प राबवीत असतात. या बाबतची माहिती विद्यापीठातील सर्व शिक्षकांना वेळेत होऊन त्या अनुषंगाने योजना व प्रकल्पांचे प्रस्ताव विषयानुरुप व योग्य त्या पध्दतीने वेळेत सादर होणे आवश्यक आहे. सदरची बाब विचारात घेता विद्यापीठातील संशोधन वृध्दींगत होण्यासाठी व विद्यापीठातील शिक्षकांच्या सोईंसाठी मा. कुलगुरु यांनी विविध वित्तीय शिखर संस्थानिहाय समन्वयकांची खालीलप्रमाणे नियुक्ती केली आहे.

| अनु. क्रं. | समन्वयकांचे नाव | वित्तीय संस्थेचे नाव |
|---|---|---|
| १ | डॉ. ए. व्ही. मोहोळकर, पदार्थविज्ञान अधिविभाग | BARC |
| २ | डॉ. डी. एस. भांगे, रसायनशास्त्र अधिविभाग | DST |
| ३ | डॉ. के. डी. पवार, स्कुल ऑफ नॅनोसायन्स अॅण्ड टेक्नॉलॉजी अधिविभाग | DBT |
| ४ | डॉ. के. डी. कुच्चे, गणित अधिविभाग | UGC |
| ५ | डॉ. एस. ए. शिंदे, इलेक्ट्रॉनिक्स अधिविभाग | NASI/MSCW/NAMP |
| ६ | डॉ. ए. एस. जाधव, पर्यावरणशास्त्र अधिविभाग | MOEF/CSIR/RGSTC |
| ७ | डॉ. पी. एम. माने, समाजशास्त्र अधिविभाग | ICHR/ICSSR |
| ८ | डॉ. जे. बी. यादव, युसिक अधिविभाग | INSA/DRDO |

सदरच्या विविध वित्तीय शिखर संस्थांच्या संकेतस्थळांवर जाहीर होणाऱ्या सुचनांबाबतचा आढावा घेणे व ते विद्यापीठातील सर्व शिक्षकांपर्यंत पोहचवणे याअनुषंगाने कामकाज करण्यासाठी सदर समन्वयकांची नियुक्ती झाली आहे. सदर समन्वयकांमार्फत, संबंधीत वित्तीय शिखर संस्थांच्या संकेतस्थळांवर वेळोवेळी प्रसिध्द होणाऱ्या सुचना, परिपत्रके, मार्गदर्शक नियमावली, इ.चा आढावा घेण्यात येईल व त्याबाबत विद्यापीठातील सर्व संबंधीत शिक्षकांना समन्वयकांकडून अवगत करण्यात येईल. जेणेकरुन विद्यापीठातील संशोधनाचा स्तर जास्तीत जास्त उंचावण्यासाठी विद्यापीठातील सर्व शिक्षकांना सुकर होईल.

शिखर संस्थांच्या योजना/प्रकल्प यांबाबत विद्यापीठातील शिक्षकांना काही शंका असलेस त्याचे निरसन करणेकरीता संबंधीत वित्तीय संस्थेसाठी नियुक्त केलेल्या उपरोक्त समन्वयक यांचेशी संपर्क साधण्यात यावा.

उपकुलसचिव,
म. व वि. वि. विभाग.

**म. व वि. वि. विभाग/ 1270**
**दि. 3 FEB 2021**

**प्रति,**
**अधिविभागप्रमुख/समन्वयक/संचालक,**
**सर्व अधिविभाग,**
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.**

**(सदरचे परिपत्रक विद्यापीठातील सर्व संबंधित शिक्षकांच्या निदर्शनास आणावे.)**